## -: जाहीर नोटीस :-

याव्दारे सर्व संबंधितांना सुचिल करण्यात येते कि, युध्दाभ्यास, मैदानी गोळीबार आणि तोफखाना अधिनियम, 1938 याच्या कलम 9 च्या पोट कलम (1) व (2) नुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर याव्दारे विनिर्दिष्ट क्षेत्रात दिनांक 15/01/2021 ते दिनांक 14/01/2026 या कालावधीत जिवंत दारूगोळयासहीत मैदानी व तोफखाना सराव प्रशिक्षणासाठी अधिसूचित क्षेत्र म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहे.

विनिर्दिष्ट ठिकाणे ही वेगवेगळया दिवसांकरीता, वेगवेगळी लक्ष्ये साध्यासाठी प्रशिक्षणातील विविधता आणि त्याबरोबरच एखादे विशिष्ट गाव किंवा गावाच्या समुहाचे संपुर्ण विनिर्दिष्ट कालावधीत सततचे स्थलांतर टाळण्यासाठी निवडण्यात आली आहेत. विनिर्दिष्ट क्षेत्रातील फक्त अशीच गावे आणि धोकादायक क्षेत्र म्हणून असलेली क्षेत्रे हे सरावासाठी आवश्यक दिवशीच महसुल अधिका-यांमार्फत धोकादायक क्षेत्र म्हणुन विहित नोटिस देऊन खाली करण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत विनिर्दिष्ट क्षेत्रातील सर्व गावांबाबत वरील संपूर्ण कालावधी दरम्यान स्थलांतराची कारवाई केली जाणार नाही.

अधिसूचित क्षेत्राचा गोषवारा खालीलप्रमाणे

| तालुका | गांव | खाजगी जमीन एकुण क्षेत्र (हेक्टर) | सरकारी जमीन एकुण क्षेत्र (हेक्टर) | वन जमीन एकुण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| अहमदनगर | देहेरे | १८१.७८ | ० | ९४.७३ |
| | इस्लामपुर | ३१.३९ | २.१२ | १८.३८ |
| | शिंगवे | ११८.२५ | ९.४७ | ० |
| | नांदगांव | ३८५.२२ | ९८.५५ | ० |
| | सुजलपूर | २००.२३ | ४०.७१ | ० |
| | घाणेगांव | ७४.४० | ० | ० |
| | **एकुण :-** | **९९१.२७** | **१५०.८५** | **११३.११** |
| राहुरी | बाभुळगांव | ३०४.४० | ३३.७९ | ८१.०३ |
| | जांभुळबन | ११७.४२ | ५६४.८१ | ६.३० |
| | जांभळी | ५६७.२४ | ४३५.१९ | १०६३.७९ |
| | वरवंडी | २६०.३७ | ६३.६३ | १६७.८९ |
| | बारागांव नांदुर | १०४.१९ | २८२.७३ | १५५५.६८ |
| | कुरणवाडी | १४१.३० | २१६.५३ | ० |
| | घोरपडवाडी | ९४.४५ | ६.२७ | ० |
| | चिंचले | १३५८.३५ | ५१.९९ | ४६५.२५ |
| | गडाखवाडी | १६६.६३ | ८.१९ | ० |
| | तहाराबाद | ५.२४ | ० | ० |
| | दरडगांवथडी | १५४.५७ | ४१५.८७ | ६३८.१४ |
| | वावरथ | ८५६.४८ | १८१.५२ | १६७९.६८ |
| | **एकुण:-** | **४१३०.६४** | **२२६०.५२** | **५६५७.७६** |
| पारनेर | वनकुटे | १०२४.८७ | ५०२.१५ | २८३१.४२ |
| | | | | १२.८२ |
| | पळशी | ४८७.७९ | ६८.७९ | ० |

Scanned with CamScanner

| तालुका | गांव | खाजगी जमीन एकुण क्षेत्र (हेक्टर) | सरकारी जमीन एकुण क्षेत्र (हेक्टर) | वन जमीन एकुण क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| | वडगांव सावताळ | १८७.३६ | ० | ६७४.२१ |
| | गाजदीपुर | ३५१.५१ | ५४.११ | १९३४.३० |
| | ढवळपुरी | ३६२५.५२ | ५६०.६९ | ० |
| एकुण :- | | **५६७७.०५** | **११८५.७४** | **५४५२.७५** |
| | अहमदनगर | ९९१.२७ | १५०.८५ | ११३.११ |
| | राहुरी | ४१३०.६४ | २२६०.५२ | ५६५७.७६ |
| | पारनेर | ५६७७.०५ | ११८५.७४ | ५४५२.७५ |
| एकुण एकंदर :- | | **१०७९८.९६** | **३५९७.११** | **११२२३.६२** |

सदर सविस्तर तपशिलवार अधिसुचना तसेच युध्दाभ्यास, मैदानी गोळीबार आणि तोफखाना अधिनियम, 1938 या कायदयातील तरतुदी अहमदनगर जिल्हयाच्या **ahmednagar.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तसेच वरील गावांमधील समाविष्ठ असलेले स.नं./ ग.नं./ फॉरेस्ट कंर्पाटमेंट नंबर निहाय यादी संबंधित तहसिल कार्यालय, तलाठी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय व वन परिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात देखील प्रसिध्द करण्यात आलेली आहे व अवलोकनासाठी उपलब्ध राहील.

(डॉ. राजेन्द्र ब. भोसले)
जिल्हादंडाधिकारी अहमदनगर

क्रं.डी.सी/कार्या9ड/1361/2020
अहमदनगर दि. 29/12/2020

Scanned with CamScanner